नवराष्ट्र Pune | 11 February 2026 | Page 4

# परांजपे स्कीम्सची भावनिक टीव्हीसी चर्चेत

## भारतातील पहिलाच विशेष निवासी समुदाय

▶ **पुणे, शहर प्रतिनिधी** दिव्यांग मुलांचे संगोपन करणाऱ्या लाखो कुटुंबांच्या मनात एक प्रश्न सतत घर करून असतो—"आपल्यानंतर त्यांच्या मुलांचे काय?" ही चिंता केवळ आजची नसून आयुष्यभराची असते. मर्यादित आरोग्य सुविधा, मानसिक आरोग्य सेवांची कमतरता आणि दीर्घकालीन देखभालीसाठी खास निवासी पर्यायांचा अभाव यामुळे अनेक कुटुंबांना मोठ्या अनिश्चिततेचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेडने दिव्यांग व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबांसाठी विशेषतः विकसित केलेल्या 'स्वनिकेतन' या निवासी प्रकल्पासाठी आपला पहिला दूरचित्रवाणी जाहिरातपट (टीव्हीसी) सादर केला आहे. भारतातील हा आपल्या प्रकारातील पहिलाच विशेष निवासी समुदाय असल्याचा दावा कंपनीने केला आहे.

याबद्दल बोलताना परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे म्हणाले, "स्वनिकेतन हा केवळ गृहनिर्माण



प्रकल्प नसून काळजी, सन्मान आणि सबलीकरण या मूल्यांवर आधारित एक समुदाय आहे. लोकांच्या खऱ्या गरजांना प्रतिसाद देणाऱ्या जागा निर्माण करण्याची आमची दृष्टी कायम राहिली आहे. हा प्रकल्प त्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे. समाजाला परत देण्याच्या भावनेतून जीवनाला आधार देणारे समुदाय उभारण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." बिझनेस डेव्हलपमेंट संचालक अमित परांजपे म्हणाले, "स्वनिकेतनच्या माध्यमातून आम्ही कुटुंबे, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांच्यासोबत अर्थपूर्ण भागीदारी निर्माण करत आहोत. हा टीव्हीसी म्हणजे या समुदायाची कथा लोकांपर्यंत पोहोचवण्याची सुरुवात आहे. सर्वसमावेशक आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार गृहनिर्माणाची आमची दृष्टी यामधून स्पष्ट होते."